# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - अनाहत स्वरझंकार
- कवी / कवयित्रीचे नाव :-  डॉ. श्रुती गोडबोले

पावसाची रिमझिम, मेघांचा गडगडाट
वळीवाची सर, विजेचा कडकडाट.
निसर्ग संगीत कधी कोमल कधी विराट !!

ओढ लावणारा ओढा, खळाळणारा झरा
अथांग सागर आणि नदीचा किनारा
चैतन्याची धून वाजवतो वारा !!

पानांची सळसळ, हवेची झुळूक
आकाशाला भिडणारा वादळ वारा.
पावसाच्या तालावर फुलतो मोर पिसारा !!

ढोलकीची थाप, घुंगरांचीरुणझुणु
भुवयांची कमान आणि नयनांचे बाण.
रमणीच्या शृंगाराला लावणीचे कोंदण!

टाळांची किणकीण, षड्जातला ओंकार
शांततेतूनहि ऐकू येतो का हुंकार ?
हृदयात घुमणारा अनाहत स्वरझंकार !

Anahat Music Therapy